# ।। पंढरीची वारी ।।



टाळघोषासंगे भजनात दंग ।
वाळवंटी जनसागर अथांग ।।१।।
विठू भक्तिचे मनी अपार तरंग ।
विठ्ठल विठ्ठल टाळ बोलतो मृदंग ।।२।।
सावळ्याच्या भक्तिचा मनी चढलासे रंग ।
कृष्णदासा मनी आज सावळे तरंग ।।३।।

*-*-*

आला आषाढीचा दिन । धावे पंढरीसी मन ।।१।।
सावळे चरण । जडले रे मन ।।२।।
विठू भेटीसीऽऽ, विठू भेटीसीऽऽ, कासावीस जन ।।३।।
व्याकुळले तन, व्याकुळले मन ।।
कृष्णदासा मनी आज सावळे चरण ।।४।।
*-*-*
अरे, लागले रे ध्यान । जाता, पंढरीसी मन ।।१।।
मनी सावळे चरण । एक ध्येय ध्याता ध्यान ।।२।।
झाले रे उन्मन । गेले गेले मनपण ।।३।।
कृष्णदासा दिन आज । आनंदाचा सण ।।४।।
*-*-*
अरे हसतोसी रे पांडुरंगाऽऽ । जीवऽऽ जाहला व्याकुळ संगा ।।१।।
ठेविले कटीसी हस्त अभंगा । करी भक्ताच्या भवभय भंगा ।।२।।
पुंडलिके आणियेले श्रीरंगा । मन जाहले रे ध्यानी तव दंगा ।।३।।
कृष्णदास घडता या संगा । मन जडले रे सावळ्या या रंगा ।।४।।
*-*-*
सावळे चरण । आनंद निधान ।।१।।
सावळ्या विठूचे । विटेवरी ध्यान ।।२।।
मन धरी ध्यान । लाभले विश्राम ।।३।।
कृष्णदास म्हणे । हेचि सावळ्याचे दान ।।४।।
*-*-*
ध्याता सावळे चरण । लाचावले मन ।।१।।
मूर्ती लावण्याची खाण । पाहता आनंदा उधाण ।।२।।
हारपले भान । लोपले मी-पण ।।३।।
कृष्णदास म्हणे घडे । येता आषाढीचा सण ।।४।।
*-*-*

सावळे चरण । सावळेचि तन ।।१।।
मिटले नयन । परि हसे मन ।।२।।
सर्वांग सुंदर । चित्त घेतसे लोभून ।।३।।
कृष्णदास मनी आज । सावळ्याचे ध्यान ।।४।।

*-*-*

सावळे चरण । अचल विटेसी ।।१।।
पुंडलिके आणिले । भीवरे तीरासी ।।२।।
मनोहर ध्यान । सुखाचे निधान ।।३।।
कृष्णदास हृदयी । सावळे चरण ।।४।।

*-*-*

सावळे चरण । तेथे धावे मन ।।१।।
पंढरीसी स्थान । वैकुंठ भुवन ।।२।।
हरि जनार्दन । पतित पावन ।।३।।
मिटुनि नयन करी । भक्तांचे ध्यान ।।४।।
भक्तांलागी ओढीसी । तेचि गे कारण ।।५।।
कृष्णदासा निरंतर । सावळ्याचे ध्यान ।।६।।

*-*-*

सावळे चरण नमिता, उर्ध्व जाई भान ।
तेचि ते सावळ्या, विठूचे गे स्थान ।।१।।
अचल चरण भेटी अचल गे मन ।
अचल मन देई निर्विकल्प भान ।।२।।
सावळ्याच्या भेटी होते स्वरुपाचे ज्ञान ।
सावळ्या विटेवरी कृष्णदास मन ।।३।।

*-*-*

सावळे चरण, दावी योग खूण ।
विटेवरी तेणे, मांडिले गे ठाण ।।१।।
समत्व चित्ताचे, दावी समचरण ।
मिटले नयन, दावी नासाग्री भान ।।२।।
शिव शोभे माथ्यावरी, सहस्रार स्थान ।
ध्यानमग्न योगी, विठू सावळा जाण ।।३।।
प्रसन्न हास्यमूर्त, अमूर्ताची मूर्त ।
कृष्णदास हृदयासी, सावळ्याचे ठाण ।।४।।

*-*-*

निळा झाला सावळा । आला धावुनि भीमातळा ।।१।।
मिटुनिया दोहीं डोळा । दावी हास्य मुखकमळा ।।२।।
वीटे रोवुनि पदकमळा । भक्त लक्षितो आगळा ।।३।।
चित्तचोर निरंतर । कृष्णदास हृदयकमळा ।।४।।

*-*-*

मुख हे गोजिरे । साजिरे सुंदर ।।१।।
सावळे लोभस । रुप अनिवार ।।२।।
नीलप्रभा फाकली । दिसे सभोवार ।।३।।
कृष्णदास म्हणे झाले । परब्रह्म साकार ।।४।।

*-*-*

परब्रह्म आले । आले रे भूवर ।।१।।
चंद्रभागे तीर । क्षेत्र पंढरपूर ।।२।।
ध्यानी लक्षिती ज्यां । देव सुरवर ।।३।।
ते हे विटे सावळे । रुप मनोहर ।।४।।
कृष्णदासाचे तेणे । व्यापिले अंतर ।।

*-*-*

हरि रे, हरि हरि रे । आला भूवरी रे, आला भूवरी रे ।।१।।
पंढरपूरीऽऽ, भीवरे तीरीऽऽ । आलाऽऽ, मुरारी रे ।।२।।
रुप मनोहरी । सावळे सुंदरी । दिसे विटेवरी रे ।।३।।
चरण ध्याता, भक्तवर तो, गेला पैलतीरी रे ।।४।।
कृष्णदास मनी, निशिदिनी व्यापुनि, सावळा मुरारी रे ।।५।।

*–*–*

महाद्वारी भक्त करिती गजर । पांडुरंग नामी गर्जले अंबर ।।१।।
गाभाऱ्यात सावळे रुप विटेवर । भक्तमन व्यापुनि राही निरंतर ।।२।।
कटी कर चरण अचल विटेवर । मंदस्मित लोभस दिसे मुखावर ।।३।।
शरणांगताचाऽऽ, घेई जो कैवार । कृष्णदास लक्षी त्यासी विटेवर ।।४।।

*–*–*

ॐकारचि मूळ असे या विटेचे । रुप ते सगुण निर्गुण ब्रह्माचे ।।१।।
उभे भीमातटीचे, रुप सावळ्याचे । वेधिते लावण्य, चित्त गे भक्तांचे ।।२।।
नामरुपातीत परब्रह्म अमूर्त । मनोहर सावळे गे जाहले ते मूर्त ।।३।।
निराकार ॐकार सावळा साकार । कृष्णदास म्हणे तो भक्तिचा आकार ।।४।।

*–*–*

चरण सावळे, श्रीमुख सावळे । तनही सावळे, परि तेज आगळे ।।१।।
लावण्य प्रभा, भोवती झळाळे । दिव्य ऐसे रुप, पंढरी केवळे ।।२।।
पुंडलिके उभविले, भावभक्ति बळे । भक्तआज्ञे तिष्ठत, मिटुनिया डोळे ।।३।।
ऐसे श्रीहरी रुप, गोजिरे सावळे । कृष्णदास लक्षितो. ध्यानाचिया बळे ।।४।।

*–*–*

पांडुरंगा तुझे, करतो मी ध्यान । तुझे पायी माझे, जडले रे मन ।।१।।
मागणे ते तुजपाशी, नाही काही आन । रुपे तुझ्या माझे, वेधले गे मन ।।२।।
श्रीगुरुने दिली मज, तव प्रेम खूण । दिली तव रुपा, मज ओळखण ।।३।।
विटे जरी तू गे, मांडियेले ठाण । कृष्णदास हृदया तू, विटेसहित जाण ।।४।।

*–*–*

सावळ्या चरणांचे सापडे ना वर्म । निश्चल त्या स्थितिचे काय असे मर्म ।।१।।
सावळ्या भक्तिचे कोण दावी वर्म । कोण त्यासी कैसा आचरावा धर्म ।।२।।
सम ना होय जरी पाप-पुण्य कर्म । कृष्णदास म्हणे हाती सापडेना वर्म ।।३।।

*-*-*

सावळ्या चरणांची प्रीत । जडो मज मनी गे नीत ।।१।।
चरणी त्या असे सर्व हित । तेथे मन लागो मज हे नीट ।।२।।
भावभक्तिची पंढरीसी पेठ । तेथे उभा असे सावळा ताठ ।।३।।
होई वैराग्ये जो अति धीट । त्यासी लाभे ती गोडी गे अवीट ।।४।।
कृष्णदास लुटावया पेठ । चाले पंढरीची सत्वर गे वाट ।।५।।

*-*-*

सावळ्याची पेठ, तेथे मोठा थाट । भक्तिचे वैकुंठ, भावाची गे वीट ।।१।।
जाता लाभे तेथ, आनंद अवीट । परि वैराग्याची गाठ, तरी घडे ।।२।।
परब्रह स्वरुपऽऽ, तेथ विटे उघडे । परि सद्गुरुंची गाठ, तरी घडे ।।३।।
कृष्णदास माथा, सद्गुरुंचा हात । लाभ गे जोडिला, पंढरी पेठेत ।।४।।

*-*-*

पंढरी पेठेत, सावळा विटे ताठ । जाउनिया न्याहाळा, रुप ते नीट ।।१।।
विटे समचरण, कटीवरी हात । स्मितहास्य श्रीमुखी, भाव काय नयनांत ।।२।।
भेटी देता येतो, सावळा खुशीत । भक्त भाव प्रतिबिंब, सावळ्या मूर्तीत ।।३।।
कृष्णदासा होता, सावळ्याची भेटी । भान हारपविले, सावळ्या जगजेठी ।।४।।

*-*-*

सावळ्या चरणांची, मजलागी प्रीत । समचरण जे, वीटे उभे नीट ।।१।।
वैकुंठीचा नाथ, पंढरी ग्रामात । लक्ष माझे एक, सावळ्या मूर्तीत ।।२।।
सावळ्या या रुपे, मन माझे मोहित । सावळ्या भक्तिरंगे, कृष्णदास रंगत ।।३।।

*-*-*

भावाचिया बळे, पाहू रुप सावळे । पंढरीच्या विटेवरी, रुप आगळे ।।१।।
शामसुंदराचे रुप गे निळे । विटेवरी उभे मिटुनि नेत्रकमळे ।।२।।
सावळ्या विटेवरी, रुप सावळे । कृष्णदास ह्रदयी चरणकमळे ।।३।।

*-*-*

साजिरे सावळे रुप विटेवरी । देखण्यासी आज भक्त हो पंढरी ।।१।।
शिरता गाभारी रुप देखिता सामोरी । खिळुनिया राही दृष्टी श्रीमुखावरी ।।२।।
प्रसन्न प्रफुल्लित होउनि अंतरी । भक्त समाधान पावतो अंतरी ।।३।।
डोळे मिटुनिया जाता मनोवेगे । मनापुढे उभा सावळा तत्परी ।।४।।
अंतर्दृष्टी निरखिता सावळ्या सत्वरी । कृष्णदास सफल पंढरीची वारी ।।५।।

*-*-*

**।। विठ्ठल ।। विठ्ठल ।। विठ्ठल ।। विठ्ठल ।।**

आषाढी एकादशी - १९ जुलै २०१३
कृष्णदास (सुदेश चोगले)